दैनिक सकारात्मक विचारांचे
आनंद नगरी
Monday 2020/01/20

अरविंद मुरकूटे गोळेगाव

# जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय येथे अंधारीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट




गोळेगाव (प्रतिनिधी) - जि. प. प्रशाला अंधारीतील ऑटोमोबाईल विभागाच्या वतीने औरंगाबाद येथील जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय, एम.जी. एम. विद्यापीठ येथे क्षेत्र भेटी चे नियोजन व्यवसाय प्रशिक्षक धीरज कासलीवाल यांनी केले होते. या करीता पंकज ढोबळे, ओम राऊत, सुदर्शन धारूरकर,किशोर मते, शुभम ठोसर , सुरेश अक्कर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी सांडू काटकर यांनी त्यांचे स्वागत केले. दरम्यान सेंटर ऑफ एक्सलन्स व ईनोविशन ईनक्यूबेशन रिसर्च सेंटर या ठिकाणी भेट देण्यात आली. या ठिकाणी इंजिन, विविध भाग, वाहनात वापरण्यात येणाऱ्या विविध पध्दती, पी.यु.सी. आदीं विषयी सखोल माहिती देण्यात आली. तसेच इंडस्ट्रियल ऑटोमेशन, रोबोटिक्स या विषयी माहिती सांगितली व ताल ब्रेवो ,सिक्स ॲक्सिस वेल्डिंग रोबोट यांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यानंतर यंत्र अभियांत्रिकी विभाग व वाहन विभाग या ठिकाणी भेट देण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेले अश्व, वायू यां सारख्या रेसिंग वाहना विषयी , विद्युत वाहनांची, संबंधित विविध लॅब्स, वर्क शॉप आदींची माहिती दिली. तसेच इंजिन व कट सेक्शन ,बैलेंसिंग, अलाइनमेंट , चेसिस, कूलिंग सिस्टम, ईंधन च्या विविध तपासनी, इलेक्ट्रॉनिक सिस्टीम या विषयी माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना दहावी नंतर करिअर मधील विविध ऑपशन्स या बद्दल देखील माहिती दिली. स्टेरिंग पद्धती, इग्निशन पद्धती, मल्टी फ्युल व पर्यायी इंधन वापरून संशोधन आदिंची सखोल माहिती देण्यात आली. या वेळी धीरज कासलीवाल यांनी सूत्रसंचालन केले तर सांडू काटकर यांनी आभार मानले. या करीता प्रशालेचे मुख्याध्यापक एकनाथ जाधव, रंगनाथ काथार, अनिल मेश्राम, सुरेश अक्कर, संजय गोठवाल, भाऊसाहेब गोराडे, नंदन जाधव, संतोष हावळे ,अनिल सुरसे, विजय आढाव, विजय चोपडे, प्रवीण बुरड, प्रशांत गायकवाड, धीरज कासलीवाल, अजिनाथ ढेपले, मंदाकिनी दिडवाले, संगीता बाबरेकर, मिना धस, अर्चना हिंगमीरे, विजया महाजन आदिंचे सहकार्य मिळाले.

ात

न

रेंद्र
ळी
या
ोल
ती.
००
ार
ोल
राव
ाठी
मचे
का
ांनी
ास

# अंधारीच्या विद्यार्थ्यांची जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयास क्षेत्रभेट




औरंगाबाद , दि. १८ (सांजवार्ता ब्युरो): जि. प. प्रशाला अंधारी येथील विद्यार्थ्यांची औरंगाबाद येथील जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयात क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती. धीरज कासलीवाल यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी पंकज ढोबळे, ओम राऊत, सुदर्शन धारूरकर,किशोर मते, शुभम ठोसर , सुरेश अक्कर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. इंजिन, विविध भाग, वाहनात वापरण्यात येणाऱ्या विविध पध्दती, पी.यु.सी. आदीं विषयी सखोल माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना दहावी नंतर करिअर मधील विविध ऑपशन्स या बद्दल देखील माहिती दिली. धीरज कासलीवाल यांनी सूत्रसंचालन केले तर सांडू काटकर यांनी आभार मानले. यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक एकनाथ जाधव, रंगनाथ काथार, अनिल मेश्राम, सुरेश अक्कर, संजय गोठवाल, भाऊसाहेब गोराडे, नंदन जाधव, संतोष हावळे ,अनिल सुरसे, विजय आढाव, विजय चोपडे, प्रवीण बुरड़, प्रशांत गायकवाड़, धीरज कासलीवाल, अजिनाथ ढ़ेपले, मंदाकिनी दिडवाले, संगीता बाबरेकर, मिना धस, अर्चना हिंगमीरे, विजया महाजन आदिंचे सहकार्य मिळाले.